लोकमत

# लोकमत फेसबुकद्वारे सूरदास जयंती

## रसिक मंत्रमुग्ध : दिव्यांग गायकांसह कार्यकर्त्यांनी घरोघरी रंगवली मैफल

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** महाकवी कृष्णभक्त सूरदास यांच्या विविध भजनांच्या अनोख्या संगीत मैफिलीने लॉकडाऊनमध्येही घरोघरी अनेकांनी सूरदासांचे ऑनलाईन स्मरण केले. 'सक्षम' या संस्थेने यासंबंधी आवाहन केले होते.

सक्षम या राष्ट्रीय संघटनेमार्फत देशभर सूरदास जयंती साजरी केली जाते. मंगळवारी झालेल्या या ऑनलाईन मैफिलीत दिव्यांग दृष्टीबाधित गायकांनी सूरदासांची पदे सादर केली. सूरदास यांनी लिहिलेली दैव किती अविचारी, दिनन दु:ख हरन देव, आवत मोहन धेनु, जशोदा हरी पालने झुलावे, हरी होली है, शाम तोरी बासुरी, अखिया हरी दर्शन की यासारख्या पदांचे भजन गाऊन या उपक्रमात कार्यकर्त्यांनी भाग घेतला. शिवाजी



विद्यापीठाच्या संगीत विभागाच्या प्रमुख डॉ. अंजली निगवेकर यांनी स्वत: हार्मोनियमवर लोकमतच्या फेसबुक पेजवरून सूरदासांचे 'अब मै नाचो बहोत गोपाल' हे हिंदी आणि याचाच मराठी स्वैर अनुवाद असलेल्या 'जन्मोजन्मी पुन्हा पुन्हा मी, धुंद नाचले गोपाला' हे यशवंत देव यांनी संगीत

शिवाजी विद्यापीठाच्या संगीत विभागाच्या प्रमुख डॉ. अंजली निगवेकर यांनी स्वत: हार्मोनियमवर लोकमतच्या फेसबुक पेजवरुन भजन गायिले. याला रसिकांनी चांगला प्रतिसाद दिला.

दिग्दर्शन केलेले भजन गायिले. याशिवाय श्रद्धा घोंगडे, ऋतुजा चौगुले, सिद्धराज पाटील यांनीही घरोघरी सूरदास यांची पदे गाऊन स्मरण केले. या उपक्रमात सक्षमच्या अजय वनकुद्रे, रतन गुरव, करण आडूरकर, भक्ती करकरे, सारिका करडे, आदी सहभागी झाले.

यावेळी सक्षम संस्थेचे अध्यक्ष गिरीश करडे, संचालक डॉ. चेतन खारकांडे, उपाध्यक्ष डॉ. शुभांगी खापरडे सहभागी झाले होते.

# विद्यापीठाच्या 'कोरोना'विषयक ऑनलाईन चाचणीला प्रतिसाद

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या एनएसएस विभाग व शिव साहायता आपत्ती व्यवस्थापन केंद्राच्या कोव्हीड १९ ऑनलाईन जनजागृती मोहिमेस नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. अवघ्या आठ दिवसांत दीड लाखाहून अधिक जणांनी ही चाचणी देऊन प्रशस्तिपत्रे प्राप्त केली आहेत.

कोव्हीडविषयीची वस्तुनिष्ठ माहिती लोकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. दि. २१ एप्रिल रोजी सायंकाळी या मोहिमेला सुरुवात



झाली. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही जनजागृती मोहीम राबवली जात आहे. मोहिमेसाठी राष्ट्रीय सेवा योजना कक्षाचे संचालक प्रा. अभय जायभाये आणि विद्यापीठाच्या शिव साहायता आपत्ती व्यवस्थापन केंद्राचे डॉ. डी. के. गायकवाड यांच्यासह मोहिमेत शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रविज्ञान अधिविभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. अमोल कुलकर्णी, शिवाजी विद्यापीठाचे तंत्रज्ञान अधिविभागातील स्वयंसेवक अविनाश पवार यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. उपक्रमाला वाढता प्रतिसाद लक्षात घेता कुलगुरू डॉ. शिंदे यांनी ही मोहीम केवळ प्राध्यापक व शिक्षक यांच्यापुरती मर्यादित न राहता समाजातील सर्व घटकांनी यात सहभागी होऊन कोव्हीड-१९ च्या जनजागृतीस प्रतिसाद द्यावा, असे आवाहन केले.

# ऑनलाईन परीक्षांना विद्यार्थी संघटनांचा विरोध

## अभ्यासक्रम पूर्ण करूनच परीक्षा घेण्याची मागणी

कोल्हापूर, ता. २८ : राज्यातील सर्व विद्यापीठांच्या परीक्षा कोरोनाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी पुढे ढकलल्या. या परीक्षा कधी आणि कशा प्रकारे व्हाव्यात, यासाठी सात कुलगुरूंची समितीही नेमली असून, या समितीने अहवाल दिल्यानंतरच परीक्षांबाबत निर्णय होणार आहे. परीक्षांच्या कार्यवाहीबद्दल विद्यार्थी संघटनांनी ऑनलाईन परीक्षेला विरोध केला आहे.

अभ्यासक्रम पूर्ण करणे, परीक्षेनंतर निकाल लावणे अशा काही सूचना त्यांनी निवेदनाद्वारे प्रशासनाला सुचविल्या आहेत. तसे निवेदनही त्यांनी राज्यपाल आणि उच्च व तंत्रशिक्षणमंत्र्यांना दिले आहे. शैक्षणिक गुणवत्तेशी तडजोड न करण्याची भूमिका मांडली आहे. अखिल भारतीय विद्यार्थी परिषद आणि ऑल इंडिया स्टुडंट फेडरेशन यांनी निवेदन दिले होते.

**“ विद्यापीठांनी ऑनलाईन परीक्षा घेऊ नयेत. ग्रामीण आणि दुर्गम भागातील विद्यार्थी ऑनलाईन परीक्षेसाठी मानसिक आणि तांत्रिक पातळीवर सक्षम असतीलच, असे नाही. आधी अभ्यासक्रम पूर्ण करूनच परीक्षा घ्याव्यात.**

**– प्रशांत अंबी,** राज्य सचिव, ऑल इंडिया स्टुडंट फेडरेशन.

**“ विद्यापीठांनी शैक्षणिक गुणवत्तेशी तडजोड करू नये. लॉकडाउन उठल्यावर अभ्यासक्रम पूर्ण करावा. जून, जुलैमध्ये परीक्षा घ्याव्यात. परीक्षा झाल्यावर २५ दिवसांत निकाल लावावेत. विद्यापीठ स्तरावरील परीक्षा ऑनलाईन न घेता लेखीच घ्याव्यात.**

**– प्रतीक पाटील**

### उपस्थित केले मुद्दे :

- महाविद्यालयांनी अभ्यासक्रम पूर्ण करावा
- विद्यापीठ स्तरावरील सर्व परीक्षा लेखी घ्याव्यात
- परीक्षा घेतल्यावर २५ दिवसांत निकाल जाहीर करा
- अभ्यासक्रम अपूर्ण असलेल्या महाविद्यालयांनी शैक्षणिक शुल्क परत करावे
- शिक्षणाच्या गुणवत्तेत तडजोड करू नये.

पुढारी

# विद्यापीठांच्या परीक्षा १ जुलैपासून

## विद्यापीठ अनुदान आयोगाच्या समितीची शिफारस; शैक्षणिक वर्ष सप्टेंबर ते जुलै

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

विद्यापीठांच्या रखडलेल्या परीक्षा १ जुलै ते ३१ जुलै या कालावधीत आयोजित कराव्यात. याचबरोबर अंतर्गत मूल्यमापनासाठी आवश्यक प्रकल्प १६ ते ३० मे या कालावधीत पूर्ण कराव्या, अशा शिफारशी विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) परीक्षा आणि शैक्षणिक वर्ष वेळापत्रक तयार करण्यासाठी स्थापन केलेल्या समितीने केल्या आहेत. यूजीसीने हरियाणा येथील केंद्रीय विद्यापीठाचे माजी कुलगुरू पान ७ वर

### यूजीसीच्या अन्य शिफारशी

- शैक्षणिक वर्षाचे नियोजन करताना २५ टक्के अभ्यासक्रम ऑनलाईन तर ७५ टक्के अभ्यासक्रम ऑफलाईन पूर्ण करावा.
- कर्मचाऱ्यांना तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण द्यावे
- विद्यापीठांनी ई-कंटेंट, ई-लॅब्ज तयार करून वेबसाईटवर अपलोड करावेत.
- प्रत्येक शैक्षणिक संस्थेने व्हर्च्युअल क्लासरूम स्थापन करावेत.

Kolhapur Edition
29 Apr, 2020 Page No. 1
Powered by : erelego.com

पुढारी

# विद्यापीठांच्या परीक्षा १ जुलैपासून

(पान १ वरून) प्रा. आर. सी. कुहाड यांच्या अध्यक्षतेखाली या समितीची स्थापना केली होती. या समितीने १५ मे पर्यंत ई-लर्निंगच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यात यावे. यानंतर १६ ते ३१ मे या कालावधीत प्रोजेक्ट वर्क, ई-लॅब्ज, अभ्यासक्रमाची पूर्तता, अंतर्गत मूल्यमापन आदी बाबी पूर्ण कराव्यात. त्यानंतर जून महिन्यात उन्हाळी सुटी असेल ही सुटी संपल्यावर १ ते १५ जुलै या कालावधीत टर्मिनल सेमिस्टर परीक्षांचे आयोजन करून त्याचा निकाल ३१ जुलैपर्यंत जाहीर करावा. तर १६ ते ३१ जुलै इंटरमीडिएट सेमिस्टर परीक्षांचे आयोजन करून त्याचा निकाल १४ ऑगस्टपर्यंत जाहीर करावा, अशा शिफारशी केल्या आहेत.

परीक्षा घेताना विद्यापीठांनी बहुपर्यायी, ओएमआर आधारित परीक्षा, ओपन बुक परीक्षा, प्रकल्पाधारित परीक्षा या पर्यायांची वापर करावा, असेही सूचित केले आहे. परीक्षा घेताना ७०:३०चे सूत्र वापरावे. म्हणजे ७० गुणांची परीक्षा विद्यापीठ घेईल तर ३० गुणांची परीक्षा अंतर्गत मूल्यमापनाद्वारे घ्यावी, अशी शिफारसही यात केली आहे. याचबरोबर विद्यापीठ त्यांच्या स्तरावर विविध संकल्पनांचा वापर करून परीक्षांचे नियोजन करू शकतात, असेही समितीने सूचित केले आहे. एकाचवेळी जास्त विद्यार्थ्यांना न बोलावता दिवसभरात दोन वेळा एकाच इयत्तेच्या परीक्षेचे आयोजनही करता येऊ शकेल. याच पद्धतीचा वापर अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांसाठीही होऊ शकतो, असेही समितीने म्हटले आहे.

दुसऱ्या वर्षापासून पुढील इयत्तांचे शैक्षणिक वर्ष १ ऑगस्टपासून सुरू होईल. तर प्रथम वर्ष पदवीचे प्रवेश १ ते ३१ ऑगस्ट या कालावधीत करून १ सप्टेंबरपासून प्रथम वर्षाचे वर्ग सुरू करावेत. याची परीक्षा १ जानेवारी ते २५ जानेवारी या कालावधीत पार पडेल. तर अंतिम परीक्षा १ ते ३१ जुलै २०२१ या कालावधीत पार पडतील. त्यामुळे यापुढे सप्टेंबर ते जुलै असे शैक्षणिक वर्ष राहील, अशी शिफारसही समितीने केली आहे.

लोकमत

# 'कोविड जनजागृती'चा दीड लाखाचा टप्पा पूर्ण

## शिवाजी विद्यापीठाच्या एनएसएसचा उपक्रम; ऑनलाईन प्रश्नमंजुषा चाचणी

लोकमत न्यूज नेटवर्क



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) विभाग व शिव सहायता आपत्ती व्यवस्थापन केंद्राच्या कोविड-१९ ऑनलाईन जनजागृती मोहिमेस प्रतिसाद मिळत आहे. अवघ्या आठ दिवसांत दीड लाखाहून अधिक जणांनी ही चाचणी देऊन प्रशस्तिपत्रे मिळविली आहेत.

ऑनलाईन प्रश्नमंजुषा चाचणी या मोहिमेचा मुख्य उद्देश कोविड विषयीची वस्तुनिष्ठ माहिती लोकांपर्यंत पोहोचविणे असा आहे. या चाचणीत कोविड म्हणजे काय?, त्याची उत्पत्ती कोठे झाली?, कोविडची लक्षणे आणि काळजी कशी घ्यावी, आदी स्वरुपातील २० प्रश्नांचा समावेश आहे. आजपर्यंत एक लाख ६० हजारांहून अधिक लोकांनी या मोहिमेत सहभागी होऊन प्रमाणपत्र प्राप्त केले आहे.

२१ एप्रिलपासून कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली संबंधित जनजागृती मोहीम राबविली जात आहे. या मोहिमेसाठी एनएसएसचे संचालक प्रा. अभय जायभाये, शिवसहायता आपत्ती व्यवस्थापन केंद्राचे डॉ. डी. के. गायकवाड, तंत्रविज्ञान अधिविभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. अमोल कुलकर्णी, स्वयंसेवक अविनाश पवार हे योगदान देत आहेत. या चाचणीत कोरोनाबाबत जनजागृतीवर आधारित प्रश्नांचा समावेश आहे.

समाजातील सर्व घटकांनी या मोहिमेत सहभागी होऊन कोविड बाबतच्या जनजागृतीस प्रतिसाद द्यावा, असे आवाहन विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले आहे.

Hello Kolhapur
Page No. 2 Apr 29, 2020
Powered by: erelego.com

लोकमत

## लॉकडाऊनचा परिणाम : कोल्हापुरातील मोबाईल ग्राहकांमध्ये दहा टक्क्यांनी वाढ

# बीएसएनएलला 'अच्छे दिन'; रोज १६ टीबी डाटाचा वापर

**संतोष मिठारी ।**
लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कोरोनाच्या पार्श्वभूमीवरील लॉकडाऊनमुळे शैक्षणिक, मनोरंजन, वैद्यकीय, बँकिंग, उद्योग-व्यवसाय, आदी विविध क्षेत्रात ऑनलाईन कामाचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे इंटरनेटचा वापर वाढला आहे. कोल्हापूरकर हे भारत संचार निगम लिमिटेडचा (बीएसएनएल) रोज १६ टेराबाईट (टीबी) मोबाईल डाटा वापरत आहेत. त्यामध्ये लॉकडाऊनच्या पूर्वीपेक्षा चार टीबीने वाढ झाली आहे. मोबाईल ग्राहकांची संख्या दहा टक्क्यांनी वाढली आहे.

लॉकडाऊनमुळे बहुतांश क्षेत्रांत वर्क फ्रॉम होम सुरु आहे. विविध क्षेत्रातील कंपन्या आणि संस्थांच्या बैठका या ऑनलाईनपणे घेतल्या जात आहेत. आर्थिक व्यवहार हे ऑनलाईन पद्धतीने होत आहे. शाळा, महाविद्यालये, विविध शैक्षणिक संस्था, आदींनी ऑनलाईन शिक्षणाचे पाऊल टाकले आहे.

मनोरंजनासाठी इंटरनेटचा वापर केला जात आहे. या सर्वांचा परिणाम म्हणजे गेल्या ३४ दिवसांमध्ये मोबाईल डाटा वापरण्याचे प्रमाण वाढले आहे. कोल्हापूर जिल्ह्यात बीएसएनएलचे सुमारे दोन लाख मोबाईल ग्राहक आहेत. लॉकडाऊनपूर्वी रोजचा डाटाचा वापर ११ ते १२ टीबीपर्यंत होता. त्यामध्ये चार टीबी इतकी वाढ झाली आहे.

बीएसएनएलबरोबरच कोल्हापूरमध्ये सेवा पुरविणाऱ्या अन्य कंपन्यांच्या डाटा वापर करण्यांमध्ये देखील वाढ झाली आहे. डाटा वापरण्याचे प्रमाण कोल्हापुरात पहिल्यांदाच इतक्या स्वरुपामध्ये वाढले आहे.

### टप्प्या-टप्प्याने वाढला वापर



लॉकडाऊनच्या कालावधीमध्ये कोल्हापुरातील बीएसएनएल डाटा वापरामध्ये चार टीबीने वाढ झाली आहे. ही वाढ टप्प्या-टप्प्याने झाली आहे, असे बीएसएनएल कोल्हापूरचे मुख्य महाप्रबंधक संजयकुमार चौधरी यांनी सोमवारी सांगितले. डाटाचा वापर वाढला, असला तरी नेटवर्कदेखील तितक्याच क्षमतेने योग्यपणे कार्यरत आहेत. यापुढे डाटा वापर जरी, रोज आणखी दहा टीबीने वाढला, तरी तितके नेटवर्क पुरविण्याची क्षमता बीएसएनएलची असल्याचे त्यांनी सांगितले.

### टेराबाईट म्हणजे काय?

मेगाबाईट, गिगाबाईट टेराबाईट, पेटाबाईट हे संगणकाची स्मरण क्षमता तसेच माहिती मोजण्याचे एकक आहे. १०२४ गिगाबाईट (जीबी) म्हणजे एक टेराबाईट (टीबी) असते.

> आतापर्यंत 'बिग डाटा' हा शब्द अनेकांना केवळ माहीत होता. लॉकडाऊनमुळे सध्या त्याचा प्रत्येकजण अनुभव घेत आहे. अधिकतरजण मोबाईल डाटाचा उपयोग केवळ मनोरंजन आणि शुभसंदेश पाठविण्यासाठी करत होते. मात्र, आता दैनंदिन जीवनातील विविध व्यवहार करण्यासाठी त्याचा वापर वाढला असून ते चांगले चित्र आहे.
>
> **- डॉ. आर. के. कामत,** संगणकशास्त्र विभागप्रमुख, शिवाजी विद्यापीठ.

## 'प्रश्नावली भरा'

कोल्हापूर: शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अभ्यास अध्यासनाच्या वतीने करोनाकाळात माध्यमांसदर्भात प्रश्नावली भरून देण्याचे आवाहन केले आहे. करोना पार्श्वभूमीवर सध्याच्या काळात सर्वसामान्य लोक विविध प्रकारची माध्यमे कशी हाताळतात, कोणत्या माध्यमासाठी किती वेळ देतात, हे अभ्यासण्यासाठी या अभ्यासक्रमाच्या अंतर्गत एक प्रश्नावली तयार करण्यात आली आहे. ही प्रश्नावली भरून खाली दिलेल्या लिंकवर सबमिट करण्याचे आवाहन अध्यासनाच्या वतीने समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले आहे. प्रश्नावली भरून देण्यासाठी docs.google.com या लिंक वर संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

थोडक्यात महत्त्वाचे

# 'कोविड १९' परीक्षेस दीड लाख नागरिकांचा प्रतिसाद

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या एनएसएस विभाग व शिव सहायता आपत्ती व्यवस्थापन केंद्राच्या कोरोना ऑनलाईन जनजागृती मोहीम सुरू केली आहे. या चाचणीस नागरिकांनी प्रचंड प्रतिसाद दिला असून अवघ्या आठ दिवसांत दीड लाखांहून अधिक नागरिकांनी ही चाचणी देऊन प्रशस्तिपत्रे प्राप्त केली आहेत. कोरोनाची वस्तुनिष्ठ माहिती लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी शिवाजी विद्यापीठाचा एनएसएस विभाग व शिव सहायता आपत्ती व्यवस्थापन केंद्राच्यावतीने कोव्हिड -१९ ऑनलाइन प्रश्नमंजुषा चाचणी घेण्यात येत आहे. आजपर्यंत एक लाख ६० हजारपेक्षा जास्त लोकांनी या मोहिमेत सहभागी होऊन प्रमाणपत्र प्राप्त केले आहे. या जनजागृती मोहिमेस महाराष्ट्रमधून मोठ्या प्रमाणामध्ये उस्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या मोहिमेसाठी प्रा. अभय जायभाये संचालक, राष्ट्रीय सेवा योजना कक्ष व डॉ. डी. के. गायकवाड शिवसहायता आपत्ती व्यवस्थापन केंद्र, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्यासह मोहिमेत विद्यापीठाच्या तंत्रविज्ञान अधिविभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. अमोल कुलकर्णी, तंत्रज्ञान अधिविभागातील स्वयंसेवक अविनाश पवार यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे.

तरुण भारत Wed, 29 April 20
https://epaper.t

# लॉ प्रथम वर्ष, एम. आर्किटेक्चर परीक्षेचे ऑनलाईन निकाल जाहीर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या वतीने उशिरा घेण्यात आलेल्या प्रथम वर्ष विधि (लॉ) अभ्यासक्रम व एम. आर्किटेक्चर परीक्षेचे ऑनलाईन निकाल जाहीर करण्यात आले आहेत. ज्या विद्यार्थ्यांना गुणपडताळणी, फोटो कॉपी, फेरतपासणीसाठी अर्ज करायचा आहे. अशा विद्यार्थ्यांनी विद्यापीठ संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज भरून स्वत: जवळ ठेवावा. शासन निर्देशानुसार विद्यापीठ कार्यालय नियमित सुरू झाल्यानंतर हे अर्ज विहीत शुल्कासह विद्यापीठात विनाविलंब स्वीकारण्यात येतील, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी दिली.